फक्त सभासदांसाठी

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
दिनांक : २५/३/२०२१

# ** परिपत्र **

विषय :- उपमहापौर या पदाची निवडणूक

-०-०-

महाराष्ट्र ( मुं.प्रां.) महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार **उपमहापौर** या पदाची निवडणूक घेणेबाबत महाराष्ट्र शासनाने केलेले महाराष्ट्र ( मुं.प्रां.)मनपा (महापौर व उपमहापौर पदासाठी निवडणूका घेणे) नियम २००५ व सुधारित नियम २००६ व २०१० मधील दुरुस्त नियम क्र. **३(१) व ३(२)** अन्वये **उपमहापौर पदाच्या निवडणुकीसाठी खास सभा (विशेष बैठक) मंगळवार, दिनांक ६/४/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता** मा.महापौर यांचे दालनात महात्मा फुले सभागृहात (मनपा सभागृहात) तसेच मा.पदाधिकारी व मा.पक्षनेते यांची पुणे महानगरपालिका भवन येथील कार्यालये तसेच प्रभागनिहाय क्षेत्रिय कार्यालयातील प्रभाग समिती कार्यालये येथून दृकश्राव्य (व्हिडीओ कॉन्फरन्सींग) द्वारे भरेल.

**महाराष्ट्र मनपा (महापौर व उपमहापौर पदासाठी निवडणूका घेणे) नियम २००५ व सुधारित सुधारित नियम २००६ व २०१० मधील दुरुस्त नियम क्र. २(अ) अन्वये मा. विभागीय आयुक्त यांचे आदेशानुसार मा.आनंद रायते, भा.प्र.से., अप्पर जमाबंदी आयुक्त आणि अतिरिक्त संचालक, भूमी अभिलेख, पुणे यांचे अध्यक्षतेखाली होणार आहे.** या सभेची कार्यपत्रिका स्वतंत्रपणे पाठविण्यात येईल.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १९(५) अन्वये उपमहापौर या पदाची निवडणूक या सभेत होईल.

उपमहापौर पदासाठी नामनिर्देशन पत्र स्विकारण्यासाठी पुढील प्रमाणे कार्यक्रम निश्चित केला आहे.

| पदाचे नाव | नामनिर्देशन पत्र दाखल करण्याचा वार व दिनांक | वेळ | नामनिर्देशन पत्र स्विकारण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| **उपमहापौर** | **बुधवार ३१/३/२०२१** | **दुपारी ३.०० ते सायं. ५.००** | **नगरसचिव कार्यालय पुणे महानगरपालिका.** |

नामनिर्देशन पत्राचे छापील अर्ज नगरसचिव कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळतील.

नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.